घनकचरा व्यवस्थापन विभाग यांच्या अधिपत्याखाली कामगार कल्याण कक्षाच्या कामाच्या स्वरुपाची माहिती खालील प्रमाणे आहे.

1) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 च्या कलम 63 (23) अंतर्गत नगरपालिकेच्या नियमित सेवेतील (कंत्राटी कामगार वगळून) साफसफाई कर्मचारी वर्गासाठी निवासस्थाने बांधणे संबंधी मालमता विभागाशी समन्वय साधून सिडको प्राधिकरणाकडून गृहनिर्माण संस्थासाठी भुखंड मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणे, राज्य शासन व केंद्र शासनाच्या धोरणानुसार, तसचे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 च्या कलम 66 (18) नुसार, कामगार कल्याण विषयक योजना तयार करणे व त्यांची अंमलबजावणी करणे, नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने (प्रथम मालक) कंत्राटी कामगार व कंत्राटदार अथवा कंत्राटी कामगार व नवी मुंबई महानगरपालिका यांच्यात औद्योगिक विवाद निर्माण झाल्यास शासकीय कामगार अधिकाऱ्याकडील सुरु असलेल्या समेट प्रक्रियेत भाग घेणे व नमुंमपाची बाजू मांडणे इ. स्वरुपाची कामे.